सं.फौ.खटला क्र.५५९/२४
सरकार / बाबा चव्हाण
निशाणी क्र.११

साक्षीदार क्र.१ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – रविंद्र दत्तू लांडगे
वडीलांचे नाव – दत्तू मल्हारी लांडगे
वय – ४५ वर्षे
व्यवसाय – मजुरी
राहणार – साठेनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली.

**<u>सरतपास सहा. सरकारी वकील श्री.बी.डी.काळे यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

१. आटपाडी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी मला राजेवाडी येथे बोलावले होते. तिथे दारु तयार करण्याची भट्टी होती. तिथे सर्व पोलीस अधिकारी व आम्ही गेलो. तिथे दारु तयार करण्याच्या भट्टीचा पंचनामा केला. तिथे माझ्यासमक्ष दारुचे कॅन, कच्चे व पक्के रसायन व दारुचे इतर साहित्य जप्त केले. त्यानंतर पोलीसांनी माझ्यासमक्ष पंचनामा तयार केला. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. पंचनाम्यास **निशाणी क्र.PW1-12** देण्यात येते. त्यावेळी आरोपी पळून गेलेला होता.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.व्ही.बी.ओलेकर यांचेमार्फत सुरु**

२. हे म्हणणे खरे आहे की, माझे घर पोलीस स्टेशनच्या शेजारीच आहे. हे म्हणणे खरे आहे की, ब–याच केसमध्ये मी या न्यायालयात साक्षीसाठी येतो. हे म्हणणे खरे आहे की, मी व राहूल नारायण वाघमारे ब–याच केसेसमध्ये पंच आहोत. हे म्हणणे खरे नाही की, आज देखील मी ३ ते ४ केसेसमध्ये साक्ष देण्यासाठी आलेलो आहे. पंचनामा कोणाच्या मालकीच्या जागेत लिहिला याची मला माहिती नाही. पोलीस स्टेशनमध्ये माझ्या सह्या घेतलेल्या नव्हत्या. पोलीस स्टेशनमधून मला साक्षीसाठी हजर राहण्यासाठी नोटीस दिली होती असे काही घडले नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यामध्ये पूर्व, पश्चिम बाजूला कोणाची जागा आहे त्याचा गट नंबर व सर्व्हे नंबर मला सांगता येणार नाही. माझा मोबाईल नं. ७७९८१९२७८९ असा आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा फोन नंबर माझा सदर केसच्या पंचनाम्यावेळी नव्हता. पंचनाम्यावेळी पोलीसांनी फोटो काढले होते असे घडले होते. पोलीसांनी भट्टीचे फोटो काढले होते. त्यावेळी मी व दुसरे पंच राहूल वाघमारे हजर असल्याबाबतचे शुटींग पोलीसांनी घेतले नव्हते. पोलीसांना शुटींग व फोटो काढण्यासंदर्भात आम्ही विनंती केलेली नाही.

४. राजेवाडी गावात मी यापूर्वी गावात गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, राजेवाडी गाव हे ४ हजार लोकसंख्येचे मोठे गाव आहे. तथाकथीत घटनास्थळावर पोलीस आल्यामुळे तिथे लोक जमा झाले होते असे काही घडले नव्हते. तथाकथीत घटनास्थळावर जाताना गावातील लोक, पोलीस पाटील भेटले असे घडले नाही. गावात गेल्यानंतर पोलीसांनी पोलीस पाटील यांना मदतीला घेतले असे काही घडले नाही. आमच्या गाडीत जाताना पेन, कागद, पॅड असे साहित्य होते. हे म्हणणे खरे आहे की, गाडी

तिथे गेली व पेन, कागद लिहून परत आली.

५. हे म्हणणे खरे नाही की, साक्ष देण्यासाठी पोलीसांकडून आम्हाला काही भत्ता दिला जातो. हे म्हणणे खरे नाही की, पंच होण्यासाठी पोलीसांकडून काही भत्ता दिला जातो. हे म्हणणे खरे नाही की, खोट्या साक्ष देण्यासाठी पोलीसांकडून आम्हाला पैसे मिळतात. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला पैसे दिले नसल्यामुळे मी आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा केला त्यातील मजकूर खरा आहे असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या म्हणण्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील आरोपीच्या हिताविरुध्द सांगितलेला संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ASHWINI JOTIRAM BACHULKAR

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2026.01.09 15:38:40 +0530

आटपाडी. (अ. जो. बाचुळकर)

दिनांक : ०९/०१/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

आटपाडी

*****